# "मी अंधळा होतो आणि आता मला दिसतं." (योहान ९)

(डॉ. रंजन केळकर, पुणे)

सबंध पवित्र शास्त्रामध्ये, जुन्या किंवा नव्या करारात, प्रभू येशूखेरीज दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने अंधळ्यांना दृष्टी दिल्याचा उल्लेख नाही. जणू "मी जगाचा प्रकाश आहे" असे म्हणणाऱ्यालाच मानवाला अंधकारमय जीवनातून प्रकाशाकडे बाहेर काढण्याचा हा अधिकार आहे. मत्तय, मार्क. लूक व योहान ह्या चार शुभवर्तमानांत येशूने दृष्टिहीन लोकांना दृष्टिदान दिल्याचे एकूण सात वृत्तान्त आहेत (मत्तय ९:२७-३१, १२:२२-२३, २०:२९-३४, मार्क ८:२२-२६, १०:४६-५२, लूक १८:३५-४२, योहान ९:१-४१) पण योहानाने लिहिलेला वृत्तान्त इतका सविस्तर आहे की, त्यासाठी एक सबंध अध्याय दिला गेला आहे.

ह्या घटनेच्या सुरवातीस येशू व शिष्य यरुशलेमकडे चाललेले असता त्यांना वाटेत एक मनुष्य दिसतो, जो जन्मापासून अंधळा असतो. त्या माणसाची अशी स्थिती का झाली असावी हा प्रश्न शिष्यांच्या मनात येतो आणि ते येशूला विचारतात की, कोणी पाप केले, ह्या माणसाने की, त्याच्या आईबापांनी. शिष्यांचा हा प्रश्न साहजिक आणि वाजवी आहे. कारण दावीदाने म्हटले आहे (स्तोत्र ५१:५), "पाहा, मी जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भधारण केले तेव्हाचाच मी पातकी आहे." आणि परमेश्वर स्वतःविषयीच म्हणतो, "मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे, जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्याचौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल शासन करतो" (निर्गम २०:५, अनुवाद ५:९). आजच्या काळातदेखील आपल्या देशात हिंदु विचारधारणेनुसार असे मानले जाते की, मागच्या जन्मात केलेल्या पापांची फळे ह्या जन्मात भोगावी लागतात.

परंतु येशू त्याच्या शिष्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देत नाही. येशू त्या अंधळ्या माणसाला कोणताही दोष देत नाही. खरे म्हणजे त्या माणसाने येशूकडून काही मागितलेलेच नसते. येशू त्याची स्थिती बघून स्वतःहून त्याची मदत करीत आहे. येशू त्याच्या शिष्यांपुढे त्याची बाजू घेत आहे. शिष्यांनी सुरू केलेल्या चर्चेत भाग घ्यायची येशूची इच्छा नाही. तो म्हणतो की, ह्या माणसाच्या पापाचा मुद्दाच ह्या ठिकाणी उपस्थित होत नाही. मनुष्याने केलेल्या पापाबद्दल शिक्षा म्हणून त्याला आजार व रोग भोगावे लागतात का ह्या वादात येशू पडत नाही. पण त्याला फक्त एक संधी दिसत आहे जिच्यामुळे देवाचे गौरव प्रकट होऊ शकेल. त्याचे काम त्याला लवकर, दिवस असेपर्यंत, पुरे करायचे आहे. कारण तो जगात आहे तोवर तो जगाचा पक्राश आहे.

असे असले तरी येशू त्या माणसाला लगेच दृष्टी प्रदान करीत नाही. तो त्याच्या डोळ्यांवर माती ओली करून लावतो आणि त्याला दूर एका तळ्यावर जाऊन ती धुऊन टाकायला सांगतो. देवाने पहिला मानव जसा मातीपासून निर्माण केला तसाच येशू येथे मातीचा वापर करून एका मातीपासून घडवलेल्या देहाची पुनर्रचना करीत आहे. आणि आतापर्यंत पापाविषयीच्या वादात न पडलेला, पण पापांची क्षमा करण्याचा अधिकार असलेला, येशू त्या माणसाला त्याचे डोळे स्वच्छ करायला, जणू त्याची पापे धुऊन टाकायला सांगत आहे. येथे येशूला हेही दाखवायचे आहे की, त्याला कोणासाठी काही करायला ती व्यक्ती समोरच असली पाहिजे असे नाही. ह्या प्रकारचे अजून एक उदाहरण म्हणजे जेव्हा येशूने दहा कुष्ठरोग्यांना सांगितले की, ते बरे होतील, पण लगेच नाही, त्यांनी याजकाला जाऊन दाखवावे, आणि वाटेत ते बरे झाले (लूक १७:१४).

तो मनुष्य येशूने सांगितले तसे करतो आणि त्याला दृष्टी येते. पण येशूच्या ह्या चिन्हाची कहाणी येथे संपत नाही. जे काही घडले त्यावर लोक विश्वास ठेवायला तयार नसतात. काहींच्या मते शब्बाथ दिवशी असे करणे योग्य नव्हते. तेव्हा त्या माणसाची पुन्हा पुन्हा चौकशी केली जाते. त्याचे आईबापसुद्धा कंटाळतात आणि म्हणतात की, मुलगा मोठा आहे, त्यालाच विचारा. पण हा मनुष्य मनाने खंबीर असतो. आधी तो म्हणतो की, ज्याने त्याला दृष्टी दिली तो कोठे आहे हे त्याला माहीत नाही. तो फक्त एक गोष्ट जाणतो: ''मी अंधळा होतो आणि आता मला दिसतं''. मग तो म्हणतो की, तो मनुष्य एक संदेष्टा आहे. नंतर तो आणखी धीट बनतो आणि त्याच्या प्रश्नकर्त्यांना विचारतो की, त्याचे शिष्य व्हायची त्यांची इच्छा आहे काय. पण सर्वात शेवटी, ही सगळी चौकशी संपल्यानंतर, तो बाहेर येतो आणि येशू तेथे स्वतः उभा असतो आणि त्याला भेटतो. तो येशूवर विश्वास ठेवतो व त्याला नमन करतो.

ह्या अंधळ्या माणसाच्या प्रदीर्घ कथेत त्याचे नाव कुठेच सांगितलेले नाही. कदाचित ह्यासाठी की, ती कथा कोणाचीही असू शकेल, आपलीसुद्धा. प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा जेव्हा कोणावर होते तेव्हा त्याचे असेच होते. आधी येशूविषयी त्याला माहिती नसते. मग तो त्याला एक संदेष्टा मानायला तयार होतो. पण शेवटी, प्रभू येशू त्याला भेट देतो आणि त्याला त्याची खरी ओळख पटते.

पण ह्या कथानकात येशू सगळ्यात शेवटी जे उद्गार काढतो ते आपल्याला अस्वस्थ करणारे आणि आपल्या विचारांना चालना देणारे आहेत. तो म्हणतो की, "मी ह्या जगात न्यायनिवाड्यासाठी आलो; म्हणजे ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावं, आणि ज्यांना दिसतं त्यांनी अंधळे व्हावं. तुम्ही जर अंधळे असता तर तुमच्याकडे पाप नसतं, पण आता तुम्ही म्हणता की, तुम्हाला दिसतं, म्हणून तुमचं पाप राहतं." आजच्या काळात, वैद्यकीय तंत्रज्ञानाची एवढी प्रगती झालेली आहे की, डोळ्यांतले कितीतरी दृष्टिदोष आता दूर केले जाऊ शकतात. पण आत्मिक अंधत्त्वावर अजून शस्त्रक्रिया करता येत नाही. अहंकार, अनादर, असहानुभूती, अंतःकरणाचा कठिणपणा, अविश्वास, ही सर्व आध्यात्मिक अंधत्त्वाची लक्षणे आहेत. आपला आध्यात्मिक अंधकार दूर करणारा प्रभू येशू हा एकमेव प्रकाश आहे.

************